ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ


LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg No. PNC-116. Licence No. 34

वर्ष ४० | पुणे, बुधवार ६ आणि २० फेब्रुवारी, १९७४ | अंक ३ आणि ४

'किर्लोस्कर पंप' हेच ना ? हे पाणी खूप दूरचा प्रवास करीत आलं आहे. मोठ्या नळातून मैलांचे अंतर तोडीत... पण त्याला खेचीत आणलं कोणी ? अर्थातच 'किर्लोस्कर पंपांनी' आणि आता ते आपल्या हाताजवळ नळात आहे.

पाणी पुरवठा... 'किर्लोस्कर पंपांचं' हे अत्यंत महत्त्वाचं काम. अनेक लहान मोठ्या शहरात, रात्रं-दिवस, 'किर्लोस्कर पंप' हे काम करीत आहेत.

दुसरीहि अनेक कामं 'किर्लोस्कर पंप' करतात.



किर्लोस्कर

शेतीसाठी आणि औद्योगिक उपयोगासाठी पाणी पुरवठा करणं, तसेच सांडपाणी खेचणं ही कामंसुद्धा ते करीत असतात.


'किर्लोस्कर पंप' अनेक प्रकारचे आहेत... छोट्या मोनोब्लॉकपासून मोठ्या व्हर्टिकल टर्बाइन पंपांपर्यंतचे विविध प्रकार... छोट्या अगर मोठ्या, शहरी अगर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी, गरजेनुसार यथा-योग्य पंप. बरं, सुटे भाग सहज मिळतात. शिवाय विक्रीपूर्व आणि विक्रीनंतरची देखभाल सेवाहि सर्वत्र मिळू शकते.

किर्लोस्कर पंप, सर्वोत्तम पंप

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-४११ ००२

कार्यालये : अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, कलकत्ता, नवी दिल्ली, इंदूर, जयपूर, मद्रास, सिकंदराबाद.



**कैद्यांना रतिसुखाचा हक्क पाहिजे** — इटलीमधील तुरुंगाच्या कारभारात सुधारणा करण्यासाठी एक कायदा करण्यात येणार आहे. ह्या विलाला सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचा पाठिंबा आहे. तुरुंगातील जीवनात रतिसुखाचा अनुभव मिळत नाही. त्यामुळे कैद्यांच्या लैंगिक जीवनावर विपरित परिणाम होतो. नव्या सुधारणेमुळे ज्या कैद्यांची तुरुंगातील वागणूक समाधानकारक असेल त्यांना रतिसुखाचा अनुभव घेण्यासाठी ५ दिवसांसाठी तुरुंगाबाहेर सोडण्यात येईल. तुरुंगातील ८० टक्के अस्वास्थ्य लैंगिक कुचंबणेमुळे होते असा इटलीच्या न्यायखात्याचा अनुभव आहे. रतिसुखाचा हक्क मिळविण्यासाठी रोममधील एका तुरुंगातील स्त्री-कैद्यांनी वक्षस्थळे उघडी ठेवून तुरुंगाच्या इमारतीवर निदर्शने केली होती.

**मोफत रक्तदान करणारांना मिळणारे समाधान** — ग्रेट ब्रिटनच्या आरोग्य खात्याच्या पटावर, १५ लक्ष मोफत रक्तदान करणारांची नावे आहेत. "मला रक्ताची आवश्यकता होती तेव्हा ते मिळाले; तेव्हा मीही दुसऱ्यांसाठी द्यायला नको का?" अशी कित्येकांची भावना असते. दहा वेळा मोफत रक्त देणारांना ब्रॉंझ बॅज मिळते, २५ वेळा देणारांना चांदीची बॅज आणि ५० वेळा देणारांना सोन्याची बॅज दिली जाते. ती बॅज हजारो स्त्री-पुरुष मोठ्या अभिमानाने छातीवर लावतात. दिलेल्या रक्ताचा कशा प्रकारे उपयोग झाला, हे रक्त देणाराला पत्राने कळविले जाते. त्यामुळे आपण एका हृदयविकाराच्या किंवा गंभीर अपघाताच्या माणसाचा प्राण वाचविल्याचे त्याला समजून फार समाधान वाटते. अर्थात, कोणत्या व्यक्तीला रक्त दिले, ते सांगितले जात नाही. रक्तदानासाठी पैसे दिले जात नाहीत, येण्या-जाण्याचा खर्चही बहुतेकजण घेण्यास तयार नसतात.

**हिशेबासाठी नवे चलन 'युरोको'** — चलनाच्या किमतीत एकसारखा चढ-उतार होत असल्याने युरोपातील बँकांनी हिशेबासाठी 'युरोको' हे खास मूल्यमापक चलन निर्माण केले आहे. विशिष्ट दिवशी 'पार्टी'भर चलनांची किंमत एकत्र करून 'युरोको'ची किंमत ठरविली जाते. त्यामुळे, चढ-उतारापासून होणारे नुकसान टळण्यास थोडीतरी मदत होते.

**शतायुषींचा क्लब** — अल्माअता (रशिया) येथे एक शतायुषींचा क्लब आहे, त्यात १०० वर्षांखालील स्त्री-पुरुषांना प्रवेश मिळत नाही. ह्या क्लबातील सर्वात वृद्ध सदस्या ११९ वर्षांची आहे. क्लबातील सदस्यांचे वैज्ञानिक खास निरीक्षण करतात आणि त्यांच्यासाठी खास आहार बनवितात. वृद्धत्व निवारण्याच्या दृष्टीने हे संशोधन उपयुक्त ठरते.

**फॅशनवर नियंत्रण पाहिजे**—रशियातील एका मानसशास्त्रज्ञाने आधुनिक फॅशन्सवर नियंत्रण ठेवण्याची सूचना केली आहे. फॅशन्समुळे कधी कधी लोकांना इजा पोचते आणि उत्पादनाच्या ठरविलेल्या कार्यक्रमात विस्कळीतपणा येतो. शिवाय, फॅशन्समुळे खोट्या सामाजिक मूल्यांची चलती होते, असा अभिप्राय त्याने व्यक्त केला आहे.

**आसाममध्ये ३९ साखर कारखाने** — आसाम इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने येत्या १४ वर्षांत राज्यात ३९ साखर कारखान्यांची उभारणी करण्याचे ठरविले आहे. सर्व कारखान्यांची उभारणी पुरी झाल्यावर ते दरसाल ७८,७५० टन साखर निर्माण करू शकतील. कारखान्यांतून २० हजार लोकांना रोजगार मिळेल.

**शस्त्रास्त्रांची विक्री सुरू करणार** — अरब-इस्राइल वाद मिटण्याची चिन्हे दिसू लागताच ब्रिटनने पश्चिम आशिआतील देशांना शस्त्रास्त्रे विकण्याचे पुन्हा सुरू करण्याचे ठरविले आहे. तथापि, तेथे पुन्हा युद्धाचा भडका उडण्याचा संभव ठरणार नाही अशा बेतानेच ती दिली जातील, असे जाहीर करण्यात आले आहे.

**लष्कराने बांधलेल्या पुलांची देणगी** — बांगला देशाच्या स्वातंत्र्ययुद्धात पडझड झालेल्या अगर पाकिस्तानी लष्कराने पाडलेल्या अनेक पुलांची दुरुस्ती भारतीय लष्कराने केली. त्याचबरोबर अनेक नवे पूल बांधले. ते सर्व बांगला देशाला देणगी म्हणून देण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. अशा नव्या पुलांची संख्या ४१ असून ते बांधण्यासाठी ४२ लाख रुपयांवर खर्च आलेला आहे.

**घाणा देशात विपुल वेश्या** — घाणा देशाच्या राजधानीत वेश्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सरकारने केलेल्या पाहणीप्रमाणे अक्रा ह्या राजधानीच्या शहरात सात पुरुषांमागे एक वेश्या असे प्रमाण पडते. त्यांची एकूण संख्या २० हजारांपर्यंत आहे. ह्या संख्येत फावल्या वेळी धंदा करणाऱ्या वेश्या धरलेल्या नाहीत.

**प्रचंड भरतीची शक्यता** — १९७४ व १९७५ ह्या दोन वर्षांत समुद्राला फार मोठ्या भरत्या येण्याची शक्यता अमेरिकेच्या राष्ट्रीय सागर व हवामान संघटनेने जाहीर केली आहे. पृथ्वी, चंद्र आणि सूर्य ह्यांच्या खगोलामधील स्थानात फेरबदल होत असल्यामुळे ही शक्यता निर्माण झाली आहे. १९७४ मध्ये ७४ दिवस आणि १९७५ मध्ये ७७ दिवस सर्व जगभर अनेक ठिकाणी प्रचंड भरत्या येण्याचा संभव आहे.

**बाहेरख्यालीमुळे हृदयविकार**—विवाहित पुरुषाने एकपत्नीव्रत पाळले नाही आणि बाहेरख्याली केली, तर त्याला हृदयविकार अधिक संभवतो, असे आढळून आले आहे. दुहेरी संभोगजीवनात गर्क होणाऱ्यांचे आयुष्य निम्म्याने घटते! जीवनाच्या ताणाचा हा परिणाम आहे.

**अग्निप्रतिबंधक साड्या** —सेंचरी मिल्सने अग्नीला थोपवणाऱ्या (फायर रिटार्डेन्ट) साड्या बाजारात आणल्या आहेत. सेंचरी मिल्समध्ये ३,०४२ माग आणि १,३६,५०४ चात्या असून ती भारतातील सर्वात मोठी कॉंपोझिट (सूत कातणारी व कापड विणणारी) गिरणी आहे.

☆ अर्थ ☆
बुधवार, ६ आणि २० फेब्रुवारी, १९७४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## तेलाची टंचाई विकासाची संधी ठरू शकेल

तेलाच्या टंचाईमुळे सर्व जगाच्या आणि त्याचबरोबर भारताच्या औद्योगिक जीवनावर अवकळा पसरू पाहात आहे. तथापि, ही आपत्ती वाटते तितकी वाईट घटना न ठरण्याचा संभव आता अर्थशास्त्रज्ञांना दिसू लागला आहे. साध्या भाषेत, वाईटातून चांगले निघण्याची शक्यता दिसू लागली आहे. सुदैवाने बऱ्याच प्रगत देशांच्या आणि विकसनशील देशांच्या मानाने भारताला नैसर्गिक साधनसंपत्तीची चांगली देणगी लाभलेली आहे. प्रगत देशांच्या मानाने भारतामधील पेट्रोलचा व तज्जनित पदार्थांचा खप अल्प आहे. विकास पावलेल्या प्रगत देशांच्या अर्थव्यवस्था तेलाच्या टंचाईमुळे ढवळून निघत आहेत. कारण, त्यात तेलाच्या वापराला असाधारण महत्त्व आलेले आहे. आता त्यांना उद्योगधंद्यांचा आधार बदलावा लागणार आहे. त्यासाठी बरीच मोठी भांडवली गुंतवणूक करावी लागणार आहे. अर्थव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी लागणारी नैसर्गिक साधने त्या देशाजवळ पुरेशा प्रमाणात नाहीत. त्यामुळे बदल घडविण्याचे काम सोपे जाणार नाही. पश्चिम जर्मनी, जपान, इत्यादी देशांतून अनेक कारखाने तेलाच्या अभावी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. प्रगत देशांकडून भारताकडे कोणता माल मिळू शकेल ह्याबद्दल विचारणा करण्यात येत आहेत. टायर्स व ट्यूब्ज, आधुनिक एंजिनिअरिंगची यंत्रे, रंग, रसायने, इत्यादी माल त्यांना पाहिजे आहे. भारताजवळ नैसर्गिक व कृत्रिम रबर, ताग व कापूस भरपूर आहे. कोळसा विपुलतेने उपलब्ध होण्यासारखा आहे. ह्यापुढे कोळशाला खूपच महत्त्व येणार आहे.

सध्याच्या औद्योगिक वाढीचा वेग टिकविण्यासाठी आणि त्यात वाढ करण्यासाठी कोळशावरच अवलंबून राहावे लागणार आहे. विकसित देशांना त्यांच्या अर्थव्यवस्थेची नवी घडी बसविण्यासाठी पैसा व परदेशीय चलनाची फार मोठी जरूर लागणार आहे. त्यामुळे भारताला आपल्या स्वतःच्या तांत्रिक सामर्थ्यावर पूर्वापेक्षा अधिक भर द्यावा लागणार आहे त्याशिवाय दुसरा मार्गच उरणार नाही. तेलाच्या टंचाईमुळे अनेक कृत्रिम पदार्थांचे उत्पादन संपुष्टात येण्याचा संभव आहे. अशा पदार्थांत नायलॉन, कृत्रिम धागे, कृत्रिम रबर, कृत्रिम रसायने, रंग, इत्यादी पदार्थांचा समावेश आहे. एकच उदाहरण घ्यावयाचे झाल्यास नायलॉनचे घेता येईल. नायलॉनच्या एका किलोग्रॅमची किंमत ८ रुपये होती ती आता ६० रुपयांच्या घरात गेली आहे. जगाची ह्यापुढील प्रगती शेतीच्या उत्पादनावर अवलंबून राहणार आहे. तेलाच्या ऐवजी दुसऱ्या एखाद्या सोयीस्कर इंधनाचा वापर सुरू होईपर्यंत तरी ह्या परिस्थितीत सुधारणा होणार नाही. भारतात उसाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. उसाच्या रसाच्या मळीपासून पेट्रोलसारखा इंधनपदार्थ निर्माण करता येतो. ह्या इंधनाचा उत्पादन खर्च एका लिटरमागे सुमारे ६२ पैसे इतका कमी आहे. त्याचे उत्पादन आजही करण्यात येत आहे. परंतु निर्मिती व्यापारी प्रमाणावर मात्र अजून करण्यात येत नाही. शेतीप्रधान देशांत सेंद्रिय टाकाऊ पदार्थ खूप उपलब्ध असतात. त्यांचा उपयोग करून पेट्रोलसारखे इंधन तयार करणे शक्य आहे भारताचे नियोजन मंडळ औद्योगिक शक्तीविषयी आणि देशाच्या भवितव्याविषयी नव्याने विचार करू लागले आहे.

---

## परदेशातील भारताचे संयुक्त मालकीचे कारखाने

भारतीय उद्योगपतींना आता श्रीलंका देशात संयुक्त मालकीचे कारखाने काढण्यात स्वारस्य वाटत नाही. कारण, तेथील सरकारने १९७१ मध्ये उद्योगधंदे ताब्यात घेण्याची तरतूद करणारा एक कायदा केला आहे. त्यामुळे सर्वच परदेशीय कंपन्यांना धोका निर्माण झाला आहे अशी त्यांची समजूत झाली आहे. सध्या मलेशिआ ह्या देशात संयुक्त मालकीचे कारखाने उभारण्यास भारतीय उद्योगपती उत्सुक दिसून येतात. त्या देशात उभयता देशांच्या संयुक्त मालकीचे २६ कारखाने स्थापन करण्याचा विचार चालू आहे. त्यांपैकी ९ कारखाने उभारण्यात आले असून त्यातून उत्पादनही सुरू झाले आहे. बाकीचे उभारणीच्या निरनिराळ्या अवस्थांतून जात आहेत. मलेशिआच्या खालोखाल इंडोनेशिआत असे कारखाने काढण्याची प्रवृत्ती दिसून येते. जनरल सुहार्तो ह्यांनी तेथील सरकार सुस्थिर केल्यानंतर राजकीय अनिश्चितता नाहीशी झालेली आहे, त्याचा हा परिणाम आहे. इंडोनेशिआत संयुक्त मालकीचे ७ कारखाने काढण्यास भारत सरकारने संमती दिली आहे. सध्या परदेशात भारताच्या संयुक्त मालकीचे ८९ कारखाने आहेत. त्यातील एकूण भांडवल गुंतवणूक सुमारे १८.८५ कोटी रुपये आहे. निरनिराळ्या २६ देशांत भारतीय उद्योगपतींनी भांडवल गुंतविलेले आहे. त्यात जास्त कंपन्या आग्नेय आशिआ व आफ्रिका ह्या देशांत आहेत. त्यांपैकी

३७ कंपन्यांत उत्पादन सुरू झालेले आहे. त्यांतील भांडवल गुंतवणूक ७·०५ कोटी रुपयांची आहे. ५२ कारखान्यांच्या उभारणीचे काम अद्याप चालू आहे.

१९७० पर्यंत भारतामधील उद्योगपती आफ्रिकेत कारखाने काढण्यास उत्सुक असत. परंतु त्यानंतर त्यांचे लक्ष आग्नेय आशियाकडे–विशेषत: मलेशियाकडे–लागले आहे. आफ्रिकेतील राजकीय परिस्थिती बिघडत चालली होती. शिवाय तेथील देशांतून हिंदीविरोधी वृत्तीही बळावत चालल्या होत्या, त्याचा हा परिणाम असावा. मलेशिआ आणि इंडोनेशिआनंतर थायलँडमध्ये संयुक्त मालकीचे कारखाने काढण्याचे आकर्षण हिंदी उद्योगपतींना वाटत असल्याचे दिसते. सध्या त्या देशात दोन अशा कंपन्या असून त्यांत उत्पादनही सुरू झाले आहे. एक आहे पोलादाची गिरणी आणि एक आहे कृत्रिम धागे तयार करण्याचा कारखाना. इंडोनेशिआ, मलेशिया व थायलँड ह्या देशांनी हिंदी उद्योगपतींना अनेक प्रकारच्या सवलती दिलेल्या आहेत. त्यात काही वर्षांची करमाफी आणि निर्यात मालाला खास उत्तेजन ह्यांचा समावेश आहे. संयुक्त मालकीच्या कारखान्यांत पोलाद, साखरेच्या कारखान्यांची यंत्रसामग्री तयार करणारे कारखाने, कापड गिरण्यांच्या यंत्रसामग्रीचे कारखाने, काचकामाचे व दाढीच्या पात्याचे कारखाने, इत्यादींचा समावेश आहे. त्याशिवाय हिंदी उद्योगपती शेतमालावर आधारलेले संस्करणाचे कारखाने, पेट्रोकेमिकल कारखाने, मोटारी, सायकली इत्यादींचे कारखाने काढण्यातही पुढाकार घेऊ लागले आहेत. सिंगापूर येथे बोटी बांधण्याचा एक कारखाना काढण्याचे घाटत आहे. फिलिपाईन्स ह्या देशात फक्त एकच संयुक्त मालकीचा कारखाना काढण्यात येत आहे, तो म्हणजे डिझेल एंजिनांचा. त्याशिवाय तेथे कापडगिरण्या आणि नारळावर संस्कार करणारे कारखाने काढण्यास सरकार उत्तेजन देत आहे. हिंदी उद्योगपती ह्या क्षेत्राबद्दलही आस्था दाखवत आहेत. डिझेल एंजिनांचा तेथील कारखाना लवकरच उत्पादन करू लागेल.

---

### ग्रामीण भागासाठी २६ वीजपुरवठा योजना

रूरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशनने ग्रामीण भागासाठी २६ वीजपुरवठा योजना मंजूर केल्या आहेत. १४ राज्यांतील ह्या योजनांमुळे १७,०० खेड्यांना विजेचा पुरवठा होऊ लागेल. योजना अमलात आणण्यासाठी कॉर्पोरेशन ८ कोटी रुपयांची कर्जे देणार आहे. २६ योजनांपैकी ७ योजना निरनिराळ्या राज्यांतील मागासलेल्या भागांत सुरू करण्यात यावयाच्या आहेत. त्या पूर्ण झाल्यावर ह्या भागांतील आर्थिक व सामाजिक जीवनाला नवी दिशा लागेल. योजनांचा लाभ आंध्र प्रदेश, बिहार, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि तामीळनाडू ह्या राज्यांना मिळणार आहे. सर्व योजना नव्या असून त्यांच्या अम्मलबजावणीस शक्य तितक्या लवकर प्रारंभ करण्यात येणार आहे.

### विजेच्या नियंत्रित वाटपाची व्यवस्था

अरब-इस्राएल युद्ध भडकल्यापासून जगावर तेलाच्या टंचाईची सावली पडली. भारताला तर तेलाची टंचाई चांगलीच जाणवणार आहे. परंतु ह्याचा अर्थ इतर इंधने भरपूर आहेत असा नाही. अलीकडेच विजेच्या टंचाईचा अनुभव सर्व देशांनी घेतला. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या काही वर्षांत तरी विजेची टंचाई नष्ट होण्याची शक्यता दिसत नाही. म्हणून विजेच्या नियंत्रित वाटपाची सर्वंकष व्यवस्था मध्यवर्ती सरकारतर्फे आखण्यात येत आहे. ह्या वाटपव्यवस्थेत अग्रहक्कांची श्रेणीच लावण्यात येणार आहे. अशी काही व्यवस्था अमलात आणल्याशिवाय देशाची अर्थव्यवस्था नीट चालू शकणार नाही अशी सरकारची माहिती आहे. भारत सरकारचे वीज व पाणीपुरवठा खाते ही व्यवस्था तयार करण्याचे काम करीत आहे. अर्थव्यवस्थेत कमीत कमी अडचणी निर्माण होतील अशा पद्धतीने आखणी करण्यात येत असली तरी विजेचा अपव्यय टाळण्याच्या दृष्टीने अनावश्यक वापरावर निर्बंध घालण्यात येण्याची शक्यता आहे. अनुत्पादक वापरावर तर आणखीनच कडक निर्बंध बसण्याचा संभव आहे. देशातील निरनिराळ्या भागांत निर्बंधांचे स्वरूप वेगवेगळे राहील. ज्या वेळेला विजेची मागणी व वापर सर्वात अधिक असतो त्यावेळी काही भागांत पूर्ण मागणी पुरी करता येणार नाही. अशा भागांत विजेच्या पुरवठ्याच्या वेळेचे वेळापत्रक आखावे लागेल. उलट, काही भागांत बऱ्याच प्रमाणात विजेच्या वापरात कपातच करावी लागेल. ज्या भागात पुरवठा एकूणच कमी आहे तेथे कपातीशिवाय दुसरा मार्ग राहणार नाही.



# हिंदुस्तान मिल्सचे १०१ व्या वर्षात पदार्पण

दि हिंदुस्तान स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स कंपनी लि. ची स्थापना १८७३ साली झाली, ती आता शतसांवत्सरिक उत्सव साजरा करीत आहे. १ सप्टेंबर, १९७३ रोजी तिने शंभर वर्षे पुरी केली.

शेठ ठाकरसी मूळजी, हे ह्या मिल्सचे संस्थापक होत. वेरावळ (सौराष्ट्र) येथे त्यांचा १८०७ मध्ये जन्म झाला. १८२५ मध्ये ते मुंबईस आले व त्यांनी कापडाच्या व्यापाराचा व्यवसाय सुरू केला, काही ब्रिटिश फर्म्सचे ते नोकरही होते. शेठ मूळजी जेठांच्या समवेत त्यांनी मूळजी जेठा मार्केटच्या उभारणीत महत्त्वाचा भाग घेतला. १८७१ मध्ये त्यांनी मेसर्स ठाकरसी मूळजी अँड कं. ह्या फर्मची स्थापना केली; त्या फर्मने हिंदुस्तान मिल्स कंपनीची १८७३ मध्ये उभारणी केली.

आज ह्या मिल्सचे भागभांडवल १४५·८० लक्ष रु. असून रिझर्व्हज आणि सरप्लस २४१·४२ लक्ष रु. चे आहेत. मिल्स-मध्ये १,१८,६१२ चात्या आणि २,४८९ माग आहेत. ७,००० कामगारांना मिल्समध्ये उद्योग मिळतो. २,४८९ मागांपैकी १,४३२ म्हणजे ५७% माग ऑटोमॅटिक आहेत. एकाच मिलमध्ये ह्यापेक्षा अधिक ऑटोमॅटिक माग असणाऱ्या सबंध भारतात आणखी दोनच गिरण्या आहेत. चालू वर्षी मिल्सने १८ कोटी, ११ लक्ष रु. किंमतीच्या कापडाची विक्री केली, त्यांपैकी ४·४० कोटी रु. ची निर्गत झाली. हिंदुस्तान मिल्सच्या २५० रु. च्या शेअरचा बाजारभाव आता ६२५ रु. आहे. ह्यावरून मिल्सच्या आर्थिक सुस्थितीची आणि भागधारकांना मिळणाऱ्या डिव्हिडंडच्या सातत्याची कल्पना येईल.

कॉटन मिल इंडस्ट्रीजच्या ११९ वर्षांच्या इतिहासात पुष्कळ गिरण्यांवर गंडांतरे आली. कित्येक मिल कंपन्यांनी नुकसान नाहीसे करण्यासाठी भागांची किंमत कमी केली, भागधारकांना दीर्घकाळ डिव्हिडंड दिले नाही, व्यवस्थापनाचे हस्तांतर झाले. हिंदुस्तान मिल्स मात्र वाढत गेली, यशस्वी होत गेली, आणि तिचा पाया मजबूत होत गेला. कंपनीच्या स्थापनेला १०० वर्षे होऊन गेली तरी शेठ ठाकरसी मूळजींच्या घराण्यातच तिची सूत्रे अद्याप आहेत, ही ह्या कंपनीच्या इतिहासातील एक अत्यंत अभिमानास्पद घटना आहे.

कंपनीचे सध्याचे चेअरमन, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी, हे १९३५ साली कंपनीचे प्रथम डायरेक्टर झाले आणि १९४२ पासून ते तिचे चेअरमन आहेत. श्री. कृष्णराजभाई ह्यांचा जन्म २० मे १९०९ रोजी झाला. एलफिन्स्टन कॉलेजातून ते पदवी-धर होऊन १९३० साली ते घराण्याच्या व्यवसायात सामील झाले. ज्या ज्या कंपन्यांशी आणि फर्म्सशी त्यांचा भागीदार, चेअरमन किंवा डायरेक्टर ह्या नात्याने संबंध आला, त्या असंख्य संस्थांचे यश आणि समृद्धी त्यांच्या व्यापारातील अचूकता, हुशारी आणि दूरदर्शीपणा ह्यांची निदर्शक आहेत.

१९३८ ते १९४२ ते बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशनचे चेअरमन होते, वयाच्या केवळ २९ व्या वर्षी ते ह्या जागी निवडले गेले. इतक्या तरुणपणी दुसरा कोणीही ह्या जागी निवडला गेलेला नाही. जून १९४३ ते फेब्रुवारी १९४८ ते टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाचे चेअरमन होते. १९६० सालाकरिता ते इंडियन कॉटन मिल्स फेडरेशनचे चेअरमन झाले. १९६६ पासून ते कॉटन टेक्स्टाइल्स एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलचे चेअरमन आहेत.

श्री. कृष्णराजभाई सुप्रसिद्ध अशा कितीतरी कंपन्यांच्या बोर्डावर आहेत. त्यांपैकी काही म्हणजे

हिंदुस्तान स्पि. अँड वी. मिल्स कं. लि.

क्राउन स्पि. अँड वी. कं. लि.

सिंधिया स्टीम नेव्हिगेशन कं. लि.

नॅशनल मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स लि.

सिमेन्स इंडिया लि.

कित्येक सार्वजनिक विश्वस्त-निधींचे ते विश्वस्त (ट्रस्टी) आहेत.

भारतीय टेक्स्टाइल उद्योगाचे गेली तीस वर्षे ते नेतृत्व करीत आहेत. त्या उद्योगाच्या प्रत्येक अंगोपांगाचे ते माहीतगार आहेत. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ कॉटन अँन्ड अलाइड टेक्स्टाइल इंडस्ट्रीजचे ते (IFCATI चे) पहिलेच भारतीय पदाधिकारी होत. आज ते त्याचे सीनिअर व्हाईस प्रेसिडेंट आहेत.

शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त हिंदुस्तान मिल्सनी एक छोटीशी पण आकर्षक सचित्र स्मरणिका प्रसिद्ध केली आहे तिच्यामध्ये मिल्सच्या स्थापनेचा आणि प्रगतीचा इतिहास देण्यात आला आहे. उत्पादनाच्या वाढत्या खर्चाला तोंड देण्यासाठी मिल्सने वेळोवेळी आपली यंत्रसामग्री आणि इमारती आधुनिक करीत नेली आहे. गेल्या १० वर्षांत मिल्सने अशा आधुनिकी-करणावर ३·५० कोटी रु. खर्च केले आहेत. कंपनीचे डायरेक्टर बोर्ड आणि पूर्वीचे मॅनेजिंग एजंटस् मेसर्स ठाकरसी मूळजी अँड कंपनी ह्यांच्या कंपनीच्या हितसंवर्धनाला पोषक अशा दूरदर्शीकत्वाला त्याचे श्रेय द्यावयास हवे. मिल्सच्या व्यवस्थापनाच्या तंत्रात आणि पद्धतीतही सतत सुधारणा करण्यात आली आहे. इतर काही मिल्स बिगर-टेक्स्टाइल उद्योगांत शिरल्या तसे हिंदुस्तान मिल्सनी केलेले नाही; ती शुद्ध टेक्स्टाइल मिलच राहिलेली आहे; उत्कृष्ट दर्जाचे कापड उत्पादन करण्यावरच तिने आपले लक्ष केंद्रित केले आहे.

आपल्या उत्पादनाला परदेशी बाजारपेठेत स्थान मिळवून देण्याच्या बाबतीत हिंदुस्तान मिल्स प्रथमपासूनच प्रयत्नशील

आहे. ७५ वर्षांपूर्वी मिल्स, चीन आणि जपान ह्या देशांकडे सूत निर्गत करीत असे. नंतर कोर्स ग्रे कापडाची निर्गत सुरू झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसींच्या चेअरमनशिपखाली, निर्गतीला खूपच वेग प्राप्त झाला. निर्दोष कापडाच्या निर्मितीचे महत्त्व जाणून त्यांनी त्यासाठी साध्या मागांच्या जागी ऑटोमॅटिक माग बसविण्यास प्रारंभ केला. दहा वर्षांपूर्वी मिल्सच्या एका युनिटमधील सर्व माग ऑटोमॅटिक झाले. त्यामुळे कापडाचा दर्जा खूपच सुधारला. चालू वर्षी मिल्सच्या निर्गतीची किंमत ८ कोटी रु. भरेल असा अंदाज आहे; भारतातील निर्गत करणाऱ्या पाच अग्रेसर गिरण्यांपैकी हिंदुस्तान मिल्स होईल. हिंदुस्तान मिल्सचे कापड अमेरिका, प. जर्मनी, स्वीडन, ग्रेट ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पूर्व युरोपीय देश, ह्या देशांकडे प्रामुख्याने जाते. आता त्या देशांत जपान, सिंगापूर, मलेशिया ह्यांची भर पडली आहे. अशा रीतीने कंपनी भारताला अधिकाधिक परदेशी चलन मिळवून देत आहे.

हिंदुस्तान मिल्स कंपनीच्या बोर्डावरील काहींची ओळख क्रीडापटू ह्या नात्याने कित्येकांना आहे. श्री. विजय मर्चंट, चेअरमन श्री. कृष्णराजभाईंचे धाकटे बंधु, हे तर क्रिकेटपटू म्हणून सुप्रसिद्धच आहेत. त्या खाळचे बंधु उदयकांत एम. डी. ठाकरसी हेही उत्कृष्ट क्रिकेटपटू होते. श्री. कृष्णराजभाईंचे पुत्र श्री. सुधीर के. ठाकरसी हे भारताचे टेबलटेनिस चॅंपियन होते. कै. श्री. विठ्ठलदास दामोदर ठाकरसी हे कंपनीचे १८९७ ते १९२२ डायरेक्टर होते; त्यांनी महर्षी अण्णासाहेब कर्वे ह्यांच्या स्त्रीशिक्षण प्रसारासाठी १५ लक्ष रुपयांची देणगी दिली हे सुप्रसिद्धच आहे. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी हे स्त्रियांच्या विद्यापीठाचे नाव त्या देणगीचेच निदर्शक आहे.

हिंदुस्तान मिल्समध्ये गेली दहा वर्षे कामगार आणि त्यांचे कुटुंबीय ह्यांच्याशी मनुष्यत्वाच्या दृष्टीने संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालू आहे आणि त्याला बरेच यशही येत आहे. मिल्समधील हेल्थ सेंटरच्या कामाला १२ तज्ज्ञ ऑनररी डॉक्टर्सची मदत होत असते. कामगार आणि त्यांचे कुटुंबीय ह्यांच्या सर्वांगीण हिताच्या दृष्टीने वेगवेगळ्या मार्गे प्रयत्न चालू आहेत. अपंगांच्या पुनर्वसनासाठी खास प्रयत्न करून त्यांना गिरणीत रोजगार देऊन स्वावलंबी केले जाते. १९६९ साली मिल्सला फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे 'फॅमिली प्लॅनिंग'चे पारितोषिक मिळाले, त्याचप्रमाणे 'सर्वोत्कृष्ट एम्प्लॉयर-एम्प्लॉई संबंधा'चे पारितोषिकही मिळाले; इंडियन मर्चंट्स चेंबरचे बिर्ला अवार्डही मिळाले. कामगारांसाठी मिल्स जे जे काही करते, त्याचा उत्पादनाशी संबंध लावला जात नाही; तथापि समाधानी कामगार न कळतच अधिक चांगल्या दर्जाचे, अधिक उत्पादन करतो; खोडसाळपणाकडे किंवा नासधुशीकडे तो सहसा वळत नाही, असा गेल्या १० वर्षांचा अनुभव आहे. मिल्समध्ये तंट्यामुळे बंद होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे, कारण व्यवस्थापक कामगारांशी समोरासमोर बसून विवाद्य प्रश्न सोडवितात. सर्व गिरण्यांचे कामगारच जर संपावर गेले, तर गोष्ट वेगळी. कारण तेथे बाहेरील दडपणाचा प्रश्न असतो.

"परमेश्वराची आम्हांवर नेहमीच मेहेरनजर आहे. आमच्याशी संबंध येणाऱ्या सर्वांशी दीर्घोद्योग, सचोटी, नम्रता आणि मानवता ह्यांनी युक्त असेच आमचे वागणे असते, आणि तसेच ते पुढेही राहील. 'सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेली संस्था' अशा वर्णनाला पात्र होऊ, अशा रीतीनेच आम्ही देशाची सेवा करीत राहू' असे चेअरमननी म्हटले आहे. ज्यांचा हिंदुस्तान मिल्सच्या चालकांशी संबंध आलेला आहे, त्यांना ही उक्ती वस्तुस्थितीला धरून आहे हे सहज पटेल. आम्ही ह्या प्रसंगी मिल्सला व तिच्या चालकांना त्यांच्या समाजहितैषी कार्यात अधिकाधिक यश चिंतितो. त्यांच्या पूर्वजांनी दिलेल्या व्यावसायिक सन्मार्गानेच पुढील पिढ्यातील लोक नेकीने प्रगती करीत आहेत, ह्याबद्दल पूर्वजांना खासच अभिमान वाटेल.

---

## सरकारी गाड्या अधिकच पेट्रोल वापरतात

देशाच्या अर्थव्यवस्थेतील चलनवृद्धीचा दाब कमी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या खात्यांनी खर्चात काटकसर करून ४०० कोटी रुपये वाचविण्याची योजना आखली होती. योजनेप्रमाणे खर्चात सर्वात अधिक कपात पोलाद खात्याने केली आहे. खात्याच्या खर्चात ३५·७२ कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे. त्याखालोखाल बोटवाहतूक खात्याने २२·१६ कोटी रुपयांची बचत केली आहे. अर्थखात्याने १६४ कोटींची बचत केली आहे. परंतु खात्यातर्फे वापरण्यात येणाऱ्या मोटारगाड्यांच्या पेट्रोलच्या खर्चात मात्र वाढ झालेली आहे. पेट्रोलच्या खर्चातील ही वाढ गेली कित्येक वर्षे चालू आहे. गेल्या वर्षी सगळ्यात अधिक वाढ शेतीखात्याच्या पेट्रोलखर्चात झाली आहे. त्याखालोखाल परराष्ट्रीय खात्याच्या खर्चात वाढ झाली आहे.

---

## तांब्याच्या तारांच्या चोरीमुळे नुकसान

देशाची दळणवळणाची व्यवस्था नीट चालण्यासाठी तांब्याच्या तारांची आवश्यकता असते. खांबाखांबांवरून जाणाऱ्या ह्या तारांची चोरी मोठ्या प्रमाणावर होत असते. दरसाल सुमारे ४ लाख रुपयांच्या तारा चोरीला जातात असा अंदाज आहे. त्यामुळे तारा पुन्हा घालाव्या तर लागतातच; पण टेलिफोन व टेलिग्राफपासून मिळणारे उत्पन्नही कमी होते. सर्व जगभर तांब्याच्या तारा दुर्मिळ होत चालल्या आहेत. औद्योगिक कच्च्या मालात तेलाच्या खालोखाल आता तांब्याला दुर्मिळतेमुळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. ह्या दोन्ही वस्तूंच्या किंमती सतत वाढत चालल्या आहेत.

---

### चुकीच्या करपद्धतीमुळे आर्थिक अडचणी

सुरत येथे चार्टर्ड अकाउंटंटस ऑफ इंडिआच्या स्थानिक शाखेतर्फे करपद्धतीविषयी एक परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादाचे उद्‌घाटन करताना भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. जे. सी. शहा म्हणाले की, सुसंस्कृत समाजात ज्या हेतुंसाठी कर बसविण्यात येतात ते साध्य करण्याचे कार्य सरकारला करता आलेले नाही. राज्यसंस्थेच्या कामाविषयी अलीकडे नव्या कल्पना अंगीकारण्यात आल्या आहेत. पूर्वी राज्यसंस्थेचे काम फक्त कायदा आणि सुव्यवस्था ह्यांचे रक्षण करण्याचे होते. आता लोकांच्या हिताचे संवर्धन करण्याचे कामही करावे लागते. राज्य-शकट हाकणाऱ्यांनी कर न्याय्यपद्धतीने गोळा केले पाहिजेत आणि त्यांचा उपयोग कार्यक्षमतेने केला पाहिजे. सुसंस्कृत समाजात कराच्या मार्गाने फक्त पैसे गोळा करण्याचे काम करून चालणार नाही. कराच्या पैशाचा उपयोग वैयक्तिक सुखाकरता होता कामा नये. करपद्धतीचा उपयोग करून भांडवलाचा संचय करणे, आर्थिक विषमता नाहीशी करणे आणि सामान्यतः समाजाच्या सुखाची काळजी वाहणे, ही कामे करण्यात आली पाहिजेत. दुर्दैवाने आज ह्यांपैकी एकही हेतू साध्य होत नाही. मागे प्रा. काल्डोर ह्यांनी करपद्धतीविषयी काही सूचना केल्या होत्या त्या वेळी त्या फार एकांतिक स्वरूपाच्या वाटल्या होत्या. त्यांनी प्राप्तीवरील कराचा दर सध्यापेक्षा ५० टक्क्यांनी कमी करावा अशी सूचना केली होती. त्यांनी सरकारवर आणखीही काही बंधने सुचविली होती. परंतु राज्यकर्त्यांनी कराचा दर कमी करण्याची सूचना आणि बंधने सोडून बाकीच्या सर्व सूचना मात्र अमलात आणल्या. त्याचा परिणाम परागतीत दिसत आहे.

---

### अध्यक्ष निक्सन ह्यांच्याकडे ३ लाख डॉलर्स थकबाकी

अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन ह्यांनी प्राप्तिकरासंबंधी जी माहिती खात्याला पुरविली त्याची चौकशी करण्यासाठी अमेरिकन सिनेटची एक कमिटी नेमण्यात आली होती. कमिटीने चौकशी-अखेर असा अंदाज केला आहे की अध्यक्षांकडून करापोटी मोठी रक्कम सरकारला येणे असावी. कमिटीच्या अध्यक्षांनी नक्की आकडा जाहीर केलेला नाही. परंतु माहितगाराकडून बाहेर आलेल्या माहितीप्रमाणे ही रक्कम जवळ जवळ ३ लाख डॉलर्सच्या घरात असावी. प्रे. निक्सन ह्यांना दरसालचा पगार व भत्ते ह्यांच्या पोटी २॥ लाख डॉलर्स मिळतात. ह्या वेतनाच्या मानाने १९७० व १९७१ साली त्यांनी प्राप्तिकरापोटी फक्त शेकड्यात मोजता येण्यासारखीच रक्कम भरली असे आढळून आले. त्या-नंतर अर्थातच ह्या प्रकरणाचा चांगलाच गवगवा झाला आणि अमेरिकेच्या सार्वजनिक जीवनात खळबळ माजून राहिली तेव्हा मग मि. निक्सन ह्यांनी चौकशी-कमिटीने कराच्या थकबाकी-बद्दल लवाद निवाडा द्यावा असे बोलणे सुरू केले. प्रे. निक्सन ह्यांनी योग्य तो प्राप्तिकर का भरला नाही, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. कर भरण्यात काही चूकभूल झाली का तो हेतुतःच भरण्यात आला नाही असा मुद्दा उपस्थित झाला आहे. चौकशी-कमिटीने ह्यासंबंधी अद्याप काही निर्णय घेतलेला नाही. ह्या सर्व प्रकरणाची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही. कमिटीचा निर्णय लागल्यावर जी रक्कम भरावयास पाहिजे होती पण भरली नाही ती अध्यक्ष निक्सन भरून टाकतील, परंतु त्यांच्या टीकाकारांकडून होणाऱ्या हल्ल्याला भिऊन राजीनामा मात्र देणार नाहीत असा निरीक्षकांचा अंदाज आहे.

---

### हिंदी वैमानिक परदेशीय कंपन्यात जाणार!

इंडिअन एअर लाइन्सने टाळेबंदी जाहीर केल्यानंतर हिंदी वैमानिक परदेशीय कंपन्यात नोकऱ्या धरण्याची शक्यता होती. आता टाळेबंदी उठविण्यात आली असली तरी वैमानिकांना परदेशीय कंपन्यांनी नोकऱ्या देऊ केल्या होत्या हे लक्षात ठेवले पाहिजे. विकसनशील देशांकडून त्यांना मागणी येत होती. सिंगापूर एअर लाइन्सने बोइंग ७३७ विमाने चालवू शकणाऱ्या अनुभवी वैमानिकांकडून अर्ज मागविले होते. त्याचप्रमाणे काही अरब देशांकडून ह्यासंबंधी चाचपणी चालू झालेली होती. इंडिअन एअर लाइन्सच्या वैमानिकांकडून नोकरीचा बाँड घेण्यात येत नाही. त्यामुळे त्यांच्या मनात आल्यास ते दुसऱ्या कंपनीत एकदम जाऊ शकतात. एअर लाइन्समध्ये शिकाऊ वैमानिक म्हणून प्रवेश करणारांकडून २५ हजार रुपयांचा ५ वर्षांचा बाँड घेण्यात येतो. अनुभवी व बरीच नोकरी झालेल्यांकडून मात्र असा बाँड घेण्याची पद्धत नाही. अशा वैमानिकांची भरती करण्यात येणार नाही, असा करार कमर्शिअल पायलटस् असोसिएशनशी करण्यात आलेला आहे. इंडिअन एअर लाइन्स शिकाऊ वैमानिकांपासून बोइंग विमान चालविण्याचे शिक्षण देण्यासाठी एका उमेदवारावर ३-५ लाख रुपये खर्च करते. अलीकडे कंपनीने कामाची जी पुनर्घटना केली आहे तीमुळे १०० वैमानिक जरूरीपेक्षा जादा होणार आहेत. त्यांपैकी अनेक वैमानिकांना जुनी विमानेच चालविता येतात. सुमारे ४०० वैमानिक नोकरीच्या शोधात आहेत. अनुभवी वैमानिक एकदम दुसऱ्या कंपनीत जाण्याची शक्यता फारशी नाही असे कंपनीचे मत आहे.

---

**जॉइंट स्टॉक कंपन्यांचा कारभार**—विजेची टंचाई, कामगारांतील असंतोष, महागता, इत्यादींचा लिमिटेड कंपन्यांच्या उत्पादनावर आणि वाढीवर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाही, असे एप्रिल, १९७२ ते मार्च १९७३ ह्या वर्षाचे आकडे सांगतात. प्रमुख ६०१ कंपन्यांच्या छाननीप्रमाणे, त्यांची विक्री ११% ने वाढून ती ५,०९६ कोटी रु. झाली. गुंतलेल्या भांडवलावर १४% (पूर्वीपेक्षा फक्त ०·२% कमी) व्याज सुटले.

**टेलिफोनसाठी १० वर्षे वाट पहा**—मुंबईमध्ये नवीन टेलिफोन हवा असणाऱ्यांच्या यादीत १,३५,००० नावे आहेत. नवा टेलिफोन मिळण्यास आता १० वर्षे थांबावे लागेल.

# व्यवस्थापकीय समस्या

## ही गळती थांबविली पाहिजे

( सु. वि. मेहेंदळे. बी. ई., एम्. बी. ए. )

जुनी गोष्ट आहे. ठणठणपूरच्या राजेसाहेबांनी एकदा तातडीने दरबार बोलावला. सर्व दरबारी आपापल्या जागेवर स्थानापन्न झाले. राजेसाहेबांनी दरबारी मंडळींना खजिन्याची स्थिती सांगितली व हा खजिना असाच रिता राहणार असेल तर राज्यकारभार चालायचा कसा ? राजेसाहेबांचे वैभव टिकणार कसे ? असा प्रश्न केला. यावर दरबारात हजर असलेले महसुल अधिकारी घामाघूम होऊन उभे राहून म्हणाले, "आमची सारावसुली मोहीम जोरात आहे. आम्ही प्रतिवर्षी अधिकाधिक वसुली करून खजिना भरीत आहोत. तरी हा खजिना रिकामा कसा ? हे आम्हालाही गूढ आहे."

यावर दरबारातील वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध असे राजगुरू मंद स्मित करून म्हणाले, 'मी सांगतो खजिना रिकामा कसा राहतो ते !' यांनी सेवकांना खूण करून एक मोठा बर्फाचा तुकडा आणण्यास सांगितले. हा तुकडा प्रथम महसुल अधिकाऱ्यांचे हातात देण्यात आला व त्यांना तो पुढच्या माणसाचे हातात देण्यास सांगितले. या क्रमाने हा तुकडा साधारण २०–२५ दरबारी अधिकाऱ्यांचे हातात फिरून राजगुरूंचे हाती आला. त्यांनी तो महाराजांजवळ दिला. यावर महाराज खवळून उठले व म्हणाले, "हा काय पोरखेळ आहे राजगुरू ! तुम्हाला शोभते का ही थट्टा ?"

त्यावर राजगुरू हसत म्हणाले, "महाराज ! एव्हांना आपल्या लक्षात आले असेलच की वसुली करताना हातात मोठा वाटणारा तुकडा खजिन्यात येईपर्यंत किती लहान होतो ते ! या खजिन्यातूनच वेगवेगळ्या कामासाठी पुन्हा रकमा बाहेर जातात. याच क्रमाने त्या रकमा कमी होत प्रत्यक्ष कामावर यांचा किती मोठा हिस्सा खर्च होत असणार हे निराळे सांगायला हवे का ?"

वरील गोष्टीतील विनोदाचा भाग सोडला तरी मूळ तत्त्व हे लक्षात घ्यायला हवे की, गिऱ्हाईकाचे हाती पडेपर्यंत वस्तू जितक्या हाती जाईल तेवढा त्यावरचा खर्च वाढत जातो. जितके मध्यस्थ किंवा दलाल जास्त तेवढे वाटेकरी वाढतात व परिणामी सर्वांना नफा साधायचा असेल तर गिऱ्हाइकाला वस्तू तितकी महाग होणार. याउलट वस्तूंच्या बाजारातील किंमती स्थिर असतील तर उत्पादकाला किंवा मध्यस्थांना नफा कमी पदरात पडणार. तसेच जर वस्तूंच्या किंमती वाढल्या तर किंमत आणि मागणीच्या अर्थशास्त्रातील नियमाप्रमाणे मागणीही घटणार हे नक्की. वस्तू कमीत कमी मध्यस्थ वापरून कमीत कमी वेळात व खर्चात गिऱ्हाइकापर्यंत पोहोचली तर उत्पादकालाही नफा चांगला उरतो. आज मोठमोठे कापड उत्पादक, पादत्राणांचे निर्माते, वगैरे यासाठीच स्वतःची किरकोळ दुकाने मोठ्या बाजारपेठांत उघडत आहेत व त्याचा त्यांना विविध प्रकारे उपयोग होत आहे.

वस्तूंच्या उत्पादन प्रक्रियेतही आरंभी दिलेले उदाहरण लागू पडते. जितक्या उत्पादन-प्रक्रिया जास्त तेवढा त्यावरील खर्च जास्त, नुकसानीचे प्रमाण जास्त ! एवढेच कशाला, जागेच्या अडचणीमुळे म्हणा किंवा चुकीच्या नियोजनामुळे म्हणा, जर वस्तू तयार होत असताना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सारख्या हलवाव्या लागल्या तर या प्रत्येक हलवाहलवीला मजुरी पडते, वस्तू खराब होण्याची शक्यता वाढते. परिणामी उत्पादन-खर्च वाढतो. मुंबईसारख्या शहरात जागेअभावी उंच इमारतीत कारखाने, गिरण्या चालतात व या तऱ्हेचे सामान हलवण्याचे खर्च वाढतात. वाढत्या मजुरीत असले खर्च अनेक उद्योगांना तोट्यांत आणण्यास हातभार लावीत आहेत.

सारांश, कोणताही जिन्नस किमान उत्पादन प्रक्रियेत निर्माण करून, आवश्यक तेवढ्याच खात्यांतून फिरून, कमीत कमी मध्यस्थांतर्फे शक्य तेवढ्या लवकर गिऱ्हाइकांपर्यंत कसा पोचवता येईल याचा काळजीपूर्वक अभ्यास करून उत्पादनाच्या व विक्रीच्या पद्धती आखल्या तर अनेक उद्योगांचे नफ्याचे प्रमाण वाढणार नाही का ?

---

### हुंड्यांत मोटरगाडी नको

श्रीमंत कुटुंबामधील विवाहात हुंडाही मोठा देण्यात येतो. अनेकदा वधूपक्ष भावी जावयाला मोटारगाडीही हुंडा म्हणून देतो. परंतु आता हुंड्यात मोटारगाडीचे स्थान नाहीसे झाले आहे. जयपूरमधील एका विवाहसमारंभात वधूच्या कुटुंबाने जावयाला देण्यासाठी एक मोटारगाडी नोंदली होती. वरपक्षाला ही बातमी लागताच त्याने मोटार देण्याची गरज नाही असे कळविले. वर सरकारी नोकर होता. त्याच्या पगारात मोटारगाडी ठेवण्याचे त्याला परवडणारे नव्हते. गाडी ठेवावयाची तर त्यासाठी त्याचा निम्मा पगार खर्ची पडला असता. ही आपत्ती टाळण्यासाठी त्याने मोटारगाडी घेण्याचे नाकारले. पण मोटारगाडीच्या बदली वधूपक्षाने थोडी जमीन दिली. ती घेण्यास मात्र त्याने अनमान केला नाही.

---

### काळ्या बाजारातील फॅन्सी मोटर आणि साखर

"साखर फक्त काळ्या बाजारातच उपलब्ध होती, तेव्हा जेनिफरने ( पत्नीने ) ती विकत न घेण्याचे ठरविले; त्याऐवजी ती टेबलावर सॅकरिन ठेवू लागली. 'तुम्ही श्रीमंत असाल आणि तुम्हाला फॅन्सी मोटरगाडी हवी असेल तर कितीही किंमत देऊन ती घ्या; कारण त्यामुळे इतर कुणावर अन्याय होत नाही. पण साखरेसारखी सामान्य माणसांच्या दैनंदिन गरजेची जिन्नस काळ्या बाजारात विकत घेणे समर्थनीय नाही,' असे आपल्या पत्नीने म्हटल्याचे सिनेमानट शशिकपूरने नमूद केले आहे.

---

### पाकिस्तानांत रंगीत चित्रवाणी

लाहोर आणि कराची येथील चित्रवाणी केंद्रावरून पुढील वर्षी रंगीत कार्यक्रम प्रसारित करण्यात येणार आहेत. रंगीत कार्यक्रम प्रक्षेपित करण्यासाठी लागणारी तयारी जवळजवळ पूर्ण झाली आहे. अलीकडे अमृतसर चित्रवाणीवरील हिंदी चित्रवाणीचे कार्यक्रम पाकिस्तानात फार लोकप्रिय झाले होते. अनेक शौकीन भारतामधील चित्रवाणीचे कार्यक्रमच पसंत करीत असत. कडव्या पाकिस्तान्यांना भारताचे हे सांस्कृतिक आक्रमणच वाटू लागले होते. ह्या आक्रमणाला उत्तर म्हणून पाकिस्तान हा उपक्रम सुरू करणार आहे. जाणकारांना मात्र त्याच्या यशाबद्दल खात्री वाटत नाही. कारण, भारतामधील अनेक चित्रपट चोरून पाकिस्तानात दाखविण्यात येत असतात. त्यांची पाकिस्तानातील लोकप्रियता पाहता चित्रवाणीच्या कार्यक्रमासंबंधी निराळे काही घडण्याची फारशी शक्यता नाही.

---

### आरोग्यासाठी पान खाणे चांगले

शास्त्रीय व औद्योगिक संशोधन मंडळाने दिलेल्या माहिती-प्रमाणे आरोग्यासाठी विडा खाणे चांगले आहे. भारतात पान खाण्याला सामाजिक प्रतिष्ठितपणा लाभलेला आहे. नीट तयार केलेल्या विड्यात १४ द्रव्ये घातलेली असतात. त्यामुळे विडा हा उत्तेजक व उत्साहवर्धक होतो. विड्याच्या पानात साखर आणि काही प्रकारची तेले असतात. विड्याच्या पानामुळे चर्वणास मदत होते आणि तहान भागू शकते. विड्याला लावण्यात येणाऱ्या चुन्यात 'कॅलशिअम' असते. ते शरीरात हाडांना उपयुक्त असते. शिवाय त्यामुळे अपचन, वाढलेली प्लीहा, इत्यादींना आळा बसतो. कात हा थंडाई निर्माण करतो व रेच होत असल्यास पचनाला मदत करतो. शिवाय घशातील रक्तस्रावालाही तो प्रतिबंध करतो.

---

**एअर होस्टेस कशी हवी?**—टी. डब्ल्यू. ए. कंपनीने मुंबईच्या एका वृत्तपत्रात फ्लाइट होस्टेसेसच्या जागेसाठी अर्ज मागविले आहेत. त्यातील अपेक्षा उद्बोधक आहेत. जनतेशी भरपूर संबंध असणाऱ्या ठिकाणी नोकरीचा अनुभव असणारीला प्राधान्य मिळेल. अर्जदाराची त्वचा नितळ असून ती आकर्षक दिसली पाहिजे. तिचे वागणे मोहक असावे; इतरांत मिसळण्याची आणि नोकरीस पोषक अशी प्रवृत्ती पाहिजे. दात चांगले, सरळ असायला हवेत. हातावर, गळ्यावर किंवा चेहऱ्यावर जन्मखूण अथवा वण दिसता कामा नये. वय २०–२७ वर्षे, अविवाहित, उंची १५८ ते १७५ सेंमी आणि त्याला अनुरूप वजन आवश्यक.

**ग्रेट ब्रिटनमधील महागाई**—श्री. एडवर्ड हीथ ह्यांचे हुजूर पक्षाचे सरकार जून १९७० मध्ये अधिकारावर आले, तेव्हापासून आतापर्यंत येथील अन्नाच्या किमतीत ५०% ने वाढ झाली आहे, असे सरकारतर्फेच सांगण्यात आले आहे.







" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. ११ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. १०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

BANK TO BANK...

## THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth, BELGAUM**

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*




प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आता भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर

किर्लोस्कर एंजिन–शेतकऱ्याची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315-M

पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली

# कै. नारायणराव सोपानराव बोरावके

## शेती, शिक्षण, सामाजिक, औद्योगिक क्षेत्रांतील कामगिरी

श्री. नारायणराव सोपानराव बोरावके ह्यांचा जन्म दि. १७ ऑक्टोबर १८९२ रोजी झाला. त्यांचे शिक्षण मराठी ७ वी पर्यंत झाले. त्यांनी शेती, शिक्षण, सहकार इत्यादी क्षेत्रांत अत्यंत भरीव कार्य केले आहे. उसाच्या अनेक जातींची लागवड करून उत्पादनवाढही घडवून आणली आहे. फळझाडे, संत्रे, मोसंबी, चिक्कू, ग्रेपफ्रूट ह्यांची रोपे व कलमे तयार करण्यातही त्यांची कामगिरी महत्त्वाची आहे. १९२९ ते १९३५ ते



अहमदनगर जिल्हा लोकलबोर्ड सभासद होते. सरकारी डिव्हिजनल बोर्डाचेही सभासद होते. १९५३ मध्ये पुण्यातील दुष्काळ समितीचे खजिनदार म्हणून त्यांनी काम केले. महात्मा गांधी शेतकी प्रदर्शन, कोपरगाव, ह्यांचे स्थापनेपासून काम केले.

### शैक्षणिक कार्य

रानातील वस्तीवर राहाता चारी नं. १५ येथे प्राथमिक शाळा सुरू केली. श्रीरामपूर येथे नारायणराव बोरावके कॉलेज १९६० मध्ये स्थापन केले. रयत शिक्षण संस्थेतर्फे पक्क्या इमारतीचे बांधकाम केले आहे. रयत शिक्षण संस्थेचे ते उपाध्यक्ष होते. विद्यार्थी वसतिगृहे, हायस्कूले, महाराष्ट्र व्यायाम शाळा, इत्यादींना आर्थिक मदत केली आहे. क्षत्रिय माळी एज्युकेशन सोसायटीचे ते अध्यक्ष होते. सासवड येथील लक्ष्मीबाई विद्यार्थी वसतिगृहासही त्यांनी मदत केली आहे.

### शेती व्यवसाय

(१) सहकारी साखर कारखाना कोळपेवाडी-कोपरगाव, स्थापनेचे वेळी जास्तीत जास्त शेअर भांडवल देऊन, जमवून कारखाना उभारणीस मदत केली. (२) गणेश सहकारी साखर कारखाना, राहाता, यांना स्थापनेवेळी शेअर भांडवल मिळवून देण्याच्या कामी व कारखान्यास जमीन मिळवून देण्याच्या कामी मदत केली. (३) सन १९३२ मध्ये महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या भांडवलावर व संघटनेवर दि सासवड माळी या नावाचा साखर कारखाना सोलापूर जिल्ह्यातील अकलूज गावी काढून त्यांचे संचालक मंडळामध्ये कारखाना-स्थापनेपासून संचालक म्हणून काम करीत होते. (४) शेतीव्यवसाय सुधारणा, बैलाच्या नांगराऐवजी यांत्रिक ट्रॅक्टर्स व औजारे, बैलांच्या मोटेऐवजी ऑईल एंजिन, पाण्याचे पंप व इलेक्ट्रिक पंप बसवून, लिफ्ट इरिगेशनवर शेती केली. (५) सरकारी पद्धतीने कंपोस्ट खते तयार करून वापरली. (६) गव्हाच्या व कपाशीच्या सुधारलेल्या जाती लावून उत्पादनवाढ केली. (७) हायब्रीड ज्वारीचे बी तयार करून सोलापूर जिल्हा परिषदेला पुरविले. (८) कमार्शियल हायब्रीड ज्वारीची पिके घेऊन धान्यउत्पादनात वाढ केली. (९) हायब्रीड मक्याचे बी तयार केले. याप्रमाणे धान्योत्पादन करण्याचे कामी भाग घेतला.

### इतर कार्य

कोपरगाव तालुक्यातील कसबे राहाते गावात जनावरांचा दवाखाना काढून व तो दोन वर्षे चालवून ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिला. औद्योगिक क्षेत्रामध्ये किर्लोस्कर बंधू लि., किर्लोस्करवाडी या कंपनीच्या संचालक मंडळामध्ये संचालक म्हणून होते.

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्युझियम पुणे विश्वस्त समितीवर सभासद होते. दि बँक ऑफ कराड, लि. कराडचे डायरेक्टर म्हणून होते.

---

## आग्नेय आशियात जपानच्या पंतप्रधानाविरुद्ध निदर्शने का झाली?

जपानचे प्रधानमंत्री तनाका यांनी नुकताच आग्नेय आशियाचा (इंडोनेशिया, थायलंड इ.) दौरा केला. त्यांच्या दौऱ्याच्या वेळी जागोजाग त्यांच्याविरुद्ध प्रचंड निदर्शने झाली. या सर्व लोकांना श्रीमंत जपानी धंदेवाले व भांडवलदार नववसाहतवादी वाटतात. "ही मंडळी आपल्या उपक्रमात स्थानिक लोकांना दिल्याच तर अगदी कनिष्ठ जागा तेवढ्याच देतात. देशाचा कच्चा माल स्वस्तात लाटून व तयार माल जबर किमतीने गळ्यात बांधून देशावर कर्जाचा डोंगर चढवून ठेवतात. प्रगत तांत्रिक गुपिते अथवा 'नोहाऊ' स्थानिक लोकांना ठाऊक होऊ नयेत म्हणून जिवापाड जपतात." अशी ही या स्थानिक लोकांच्या गाऱ्हाण्यांची लांबलचक यादी आहे. दुसऱ्या महायुद्धात जपानने या भागावर लष्करी साधनांनी गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न केला; आज त्यासाठी जपान आर्थिक साधने वापरीत आहे, असे या भागातील विचारवंत म्हणतात.

यावर उपाय म्हणून या सरकारांनी तनाका यांच्याकडे अशी मागणी केली की, जपानची या भागात होणारी गुंतवणूक इतःपर उभय सरकारांमार्फत व्हावयास पाहिजे; खाजगी जपानी भांडवलदारांमार्फत नव्हे. तनाका यांना या बाबतीत इंडोनेशियाला व मलेशियाला निश्चित आश्वासने द्यावी लागली. जपानी उद्योगपतींचा जपानच्या सरकारवरील प्रभाव कमी होणे त्या आश्वासनांच्या पूर्तीसाठी आवश्यक आहे.

---

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

### १९७३ मधील नेत्रदीपक प्रगती :

### ठेवी रु. २८·२५ कोटींचे वर गेल्या.

**ठेवी :**—सन १९७३ मध्ये बँकेच्या एकूण ठेवींत फार मोठी म्हणजे रु. ६·३२ कोटींची वाढ झालेली असून वर्षअखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. २८·२५ कोटी झालेल्या आहेत. ही बाब निश्चित विशेष भूषणावह आहे. ठेववाढीचे प्रमाण २९ टक्के पडते.

**कर्जव्यवहार :**—बँकेच्या कर्जव्यवहारात देखील या वर्षी बरीच मोठी म्हणजे रु. ४ कोटींहून जास्त वाढ झालेली असून एकूण कर्जव्यावहार रु. १७·४० कोटींच्यावर गेलेला आहे.

**भाग-भांडवल :**—सन १९७३ मध्ये बँकेच्या वसूल भाग-भांडवलांत जवळ जवळ रु. दोन लाखांची वाढ झालेली आहे. ही वाढ या वर्षी नवीन शेअर्स विक्रीस काढल्यामुळे झालेली असून आतां बँकेचे भाग-भांडवल रु. वीस लाख झालेले आहे.

**डिव्हिडंड :**—बँकेच्या नफ्यात सन १९७३ मध्ये समाधान-कारक वाढ झालेली असून बँकेचे वसूल भाग-भांडवल या वर्षी जवळ जवळ रु. दोन लाखाने वाढलेले असूनदेखील वाढीव भाग-भांडवलावर गेल्या वर्षीइतकेच म्हणजे १० टक्के डिव्हिडंड देण्याची संचालक मंडळाने शिफारस केलेली आहे.

**राखीव निधी :**—सन १९७३ मध्ये बँकेने राखीव निधीकडे रु. दोन लाख वर्ग करण्याचे ठरविले असून यामुळे बँकेचा एकूण राखीव निधी रु. वीस लाखांच्यावर म्हणजे वसूल भाग-भांडवलाहून जास्त झाला आहे.

**शाखा वाढ :**—या वर्षी बँकेने प्रार्थनासमाज (मुंबई), मांडवी (मुंबई), गांधीबाग (नागपूर) चंद्रपूर, गोंदिया, (जिल्हा-भंडारा), वणी (जिल्हा—यवतमाळ), आर्वी (जिल्हा—वर्धा), अंमळनेर (जिल्हा—जळगांव), बारामती (जिल्हा—पुणे), पिंपरी—चिंचवड (पुणे) व पनवेल (जिल्हा—कुलाबा) अशा ११ ठिकाणी नवीन शाखा उघडल्या. बँकेच्या आता एकूण ७२ शाखा झालेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आता बँकेची शाखा आहे ही एक विशेष उल्लेखनीय गोष्ट होय.

**सर्वसाधारण :**—बँकेचे अध्यक्ष, संचालक व सेवकवर्ग बँकेच्या प्रगतीकरिता विशेष प्रयत्नशील असल्यामुळे आणि या बँकेवर महाराष्ट्रातील जनतेचा फार मोठा विश्वास असल्याने बँक १९७३ मध्ये मोठी प्रगती करू शकली. या प्रगतीबद्दल सार्वत्रिक समाधान व्यक्त करण्यात येत असून बँकेचे अभिनंदन होत आहे-युनायटेड वेस्टर्न बँक ही एका राज्यांत शाखा असलेल्या बँकां-मधील भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक आहे ही विशेष अभिमानाची आणि कौतुकाची बाब वाटते.

---

**सूर्याच्या उजेडावर चालणारे घड्याळ**—एका जपानी घड्याळ कंपनीने सूर्याच्या उजेडात ४ मिनिटे ठेवले की त्यावर २४ तास चालणारे मनगटी घड्याळ तयार केले आहे.

### अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची मंदीकडे वाटचाल

अमेरिकेचे अध्यक्ष मि. निक्सन ह्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाने अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचे १९७४ सालचे चित्र निराशा-जनक रंगात रंगविले आहे. मंडळ अध्यक्षांना सादर केलेल्या आपल्या अहवालात म्हणते की, १९७४ साली अमेरिकेत चलन-वृद्धी आणि बेकारी आणखीच वाईट अवस्थेपर्यंत पोचतील आणि अर्थव्यवस्था मंदीच्या वावटळीत हेलकावे खाऊ लागेल. देशातील किंमतीत पुढील १२ महिन्यांत ७ टक्क्यांनी वाढ होईल. किंमतवाढीच्या ह्या दौडीत अन्न आणि इंधन ह्यांच्या किंमती आघाडीवर राहतील. मंडळाने वर्तविलेले भाकीत जर खरे ठरले तर दुसऱ्या महायुद्धानंतरचे सर्वात वाईट वर्ष म्हणून १९७४ सालाकडे बोट दाखवावे लागेल. कारण, ह्यावर्षी चलन-वृद्धीची परिसीमा गाठली जाईल. १९७३ साल हेच मुळी चलन-वृद्धीच्या दृष्टीने वाईट ठरलेले आहे. १९७४ साल त्यावरही कडी करील. अहवालासोबत प्रे. निक्सन ह्यांनी काँग्रेसला उद्देशून एक निवेदन जोडले आहे. त्यात ते म्हणतात की, १९७३ सालातील चलनवृद्धीचा वेग चालू ठेवणे देशाला परवडण्यासारखे नाही. मग त्यापेक्षा अधिक चलनवृद्धी करण्याबद्दल तर बोलावयासच नको. हा धोका पत्करता येण्यासारखा नाही. तथापि, अमेरिकेच्या येत्या आर्थिक वर्षासाठी अध्यक्षांनी जी आर्थिक व्यूहरचना केली आहे तीत ९०० कोटी डॉलर्सवर तुटीच्या भरण्याची व्यवस्था केलेली आहे. ह्याचा अर्थ असा की चलनवृद्धीच्या आघाडीवर माघार घ्यावी लागली तरी अर्थव्यवस्थेची चाके सुरळीत चालू ठेवण्याचा आणि बेकारी कमीत कमी राखण्याचा प्रयत्न ते जिद्दीने करणार आहेत.

---

### अंत्यविधीसाठी स्वेच्छेने केलेला खर्च

अविभक्त हिंदू कुटुंबातील आईबापाच्या अंत्यविधीसाठी जर एखाद्या मुलाने आपल्यापासून रक्कम खर्च केली असेल तर त्याला आपल्या इतर भावांपासून, त्यांच्या हिश्याच्या प्रमाणात, ती रक्कम मागता येते किंवा नाही ह्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, मुलाने जर स्वेच्छेने रक्कम खर्च केली असेल तर त्याला इतरांपासून त्या रकमेची भरपाई करून मागता येणार नाही. परंतु असे जर सिद्ध झाले की, ती रक्कम खर्च करण्याखेरीज त्याला इलाजच नव्हता तर मात्र इतरांपासून त्याला भरपाई करून मागता येईल. हाच नियम कर्जाच्या फेडीच्या बाबतीत लागू पडतो. एका मुलाने जर बापाच्या कर्जाची फेड स्वेच्छेने केली असेल तर कर्जफेडीसाठी त्याने जी रक्कम खर्च केली आहे तिची भरपाई इतर भावांपासून त्याला करून मागता येणार नाही. परंतु कर्जाची फेड केल्याखेरीज गत्यंतर नव्हते अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे जर त्याने कर्जाची फेड केली असेल तर मात्र इतरां-पासून त्याला त्या रकमेची भरपाई करून मागता येईल.

(१९७३ ऑ. इं. रि. गुजरात पृ. १९४)

# आम्ही आता आपल्या ठेवींवर दरमहा व्याज देतो.

आपल्या मासिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यास आमचाही हातभार ल्हावा या हेतूने आम्ही ही नवी ठेवयोजना निर्मिली आहे. आपण किमान रु. १००० अथवा त्याच्या पटीत रक्कम आमच्याकडे मासिक व्याज ठेवयोजनेखाली किमान २४ महिने पर्यंत ठेवा.

आमच्याकडून दरमहा मिळणाऱ्या व्याजातून आपण आपले भाडे, विद्युत बिल, टेलिफोन बिल, गॅस बिल, अशापैकी कोणतेही एक अथवा अनेक खर्च भागवू शकता.

## दरमहा व्याज मिळत राहून मूळ ठेव सुरक्षित राहते हे ह्या योजनेचे वैशिष्टय आहे.

अधिक तपशिलाकरिता नजीकच्या आमच्या शाखेस आजच भेट द्या.

# बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस – ११७७, बुधवार पेठ, पुणे – २

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

## ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,

क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

Madison/TGM/7 Mar



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२२ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)